Estd:1962
NAAC 'A' Grade
MHRD-NIRF -28th Rank

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांना (नियमित) कळविण्यात येते की, राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि महानगरपालिकांच्या निवडणूका 2017 मध्ये होणार आहेत. या निवडणूकांसाठी दिनांक 01 जानेवारी 2017 या पात्रता दिनांकावर आधारीत विधानसभेची मतदार यादी ग्राहय धरण्यात येणार आहे.

मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक 16 सप्टेंबर त 14 ऑक्टोबर 2016 या कालावधीत विधानसभा मतदार यादयांचा पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. 01 जानेवारी 2017 रोजी वयाची 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या पात्र नागरीकांनी या कालावधीत मतदार यादीत नांव नोंदविले तरच त्याला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये मतदान करता येईल.

मतदार नोंदणी हा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. त्यामुळे विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी व कर्मचारी (नियमित) यांनी आपली नांवे मतदार यादीत असलेचे खात्री www.ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर करण्यात यावी. तसेच ज्या शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांची नावे मतदार यादीमध्ये नसतील तर त्यांनी मतदार यादीत नांव सामाविष्ट करणेचा अर्ज नमुना नंबर 6 भरुन देण्यात यावा. तसेच सर्व शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी आपले नाव मतदार यादीत असलेबाबतची विभागाची एकत्रीत माहिती या कार्यालयास दिनांक 15/10/2016 पुर्वी सादर करण्यात यावी. सोबत जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयाचे दिनांक 23/09/2016 रोजीचे पत्र जोडले आहे.

प्रभारी कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/ 3724

दिनांक : 05 OCT 2016

प्रति,

1. सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक
2. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
3. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख
4. स्वीय सहाय्यक, मा.कुलगुरु, कुलसचिव, संचालक, बीसीयुडी, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी
5. इंटरनेट विभाग– सदरचे परिपत्रक INTRA NET वर प्रसिध्द करावे.

**टीप– सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व शिक्षक, अधिकारी व प्रशासकीय सेवकांच्या निदर्शनास आणावे.**

(1)

मतदार यादीतील आपल्या नावांची खात्री करण्यासाठी www.ceo.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर भेट दयावी.

निवडणूक तात्काळ

कार्या.10/निवडणूक/मत.नोंदणी./आरआर/872/16
जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर
दिनांक - 23/09/2016

प्रति,

मा. कुलगुरू,
शिवाजी विदयापीठ,
विदयानगर, कोल्हापूर.

विषय- जिल्हा परिषद /पंचायत समिती,महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूका २०१७ साठी मतदार नोंदणीकरीता जनजागृती अभियान राबविण्याबाबत.

संदर्भ - मा.राज्य निवडणूक आयोग यांचेकडील क्रं रानिआ/माजअ-२०१६/प्रक्र-४/का.१० हुतात्मा राजगूरू मार्ग मुंबई दिनांक ३ सप्टेंबर २०१६ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणास कळविणेत येते की, राज्यातील 26 जिल्हा परिषदा 197 पंचायत समित्या आणि 18 महानगरपालिकांच्या निवडणूका 2017 मध्ये होणार आहेत. या निवडणूकांसाठी दिनांक 1 जानेवारी 2017 या पात्रता दिनांकावर आधारीत विधानसभेची मतदार यादी ग्राहय धरण्यात येणार आहेत.

मा. भारत निवडणूक आयोगाने दिनांक 16 सप्टेंबर ते 14 ऑक्टोंबर 2016 या कालावधीत विधानसभा मतदार यादयांचा पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर केला आहे. 1 जानेवारी 2017 रोजी वयाची 18 वर्षे पूर्ण करणा-या पात्र नागरीकांनी या कालावधीत मतदार यादीत नांव नोंदविले तरच त्याला आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकांमध्ये मतदान करता येईल.

मतदार नोंदणी हा राष्ट्रीय कार्यक्रम आहे. त्यामुळे आपल्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांची नांवे मतदार यादीत असलेचे खात्री करणेसाठी www.ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर भेट देणेबाबतच्या सूचना देणेत याव्यात. तसेच ज्या अधिकारी व कर्मचा-यारी यांची नावे मतदार यादीमध्ये नसले त्यांना मतदार यादीत नांव सामाविष्ट करणेचा नमुना नंबर 6 भरुन देणेबाबत आपले स्तरावरुन सूचना देणेत याव्यात. सोबत नमुना क्रं 6 जोडलेला आहे.

आपल्या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची मतदार यादीत नांव असलेबाबतची माहिती खालील नमुन्यात माहीती देणेत यावी.

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | कार्यालयातील एकूण अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या | अगोदरच मतदारयादीत नाव असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या | आता नाव नोंदणी केलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या | शिल्लक संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | |

मतदार यादीतील आपल्या नावांची खात्री करण्यासाठी www.ceo.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर भेट दयावी.

जे कर्मचारी मतदारयादीत नाव नोंद करणार नाहीत त्यांची वेतन देयक थांबविणेत येवून तसे जिल्हा कोषागार, कोल्हापूर यांना कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.

आगामी जिल्हा परिषद निवडणूकीसाठी मतदार जनजागृती एकत्रीत करणेची आहे. त्यामध्ये कोल्हापूर जिल्हातील सर्व महाविदयालयांना आपलेमार्फत कळविणेत यावे. तसेच मतदार जनजागृतीसाठी सर्व विदयार्थ्यांची यांची रॅली काढणे, पथनाटयाचे आयोजन करणे, मतदार जनजागृती करणेसाठी रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा इ. यांचे आयोजन करणेत यावे. तसेच या स्पर्धेतून प्रथम 3 क्रमांक इकडील कार्यालयाला कळविणेत यावे.

तसेच ज्या आपल्या अंतर्गत येणा-या कोल्हापूर जिल्हातील सर्व महाविदयालयातील विदयार्थ्यांनी मतदार यादीमध्ये नांव नोंदवणेसाठी प्रोत्साहित करणेत यावे. आपल्या संकेतस्थळावर मतदार नोंदणी करणेसाठीचा संदेश प्रसिध्द करणेत यावा.

मा. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या परिशिष्ट - 2 मध्ये सदरचा अहवाल व अधिकारी व कर्मचारी यांची मतदार यादीत नांव असलेबाबतची माहिती दिनांक-10 ऑक्टोबर 2016 अगोदर dydeokolhapur@gmail.com या ई मेल आयडीवर पाठविणेत यावा.

जिल्हाधिकारी व
जिल्हा निवडणूक अधिकारी
कोल्हापूर करिता

प्रत,

1) मा. जिल्हाधिकारीसो कोल्हापूर यांचे स्विय सहाय्यक यांना
2) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर.
3) उपजिल्हाधिकारी महसूल (जि.प./पं.स.)